
# छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी कुणी शोधली?

१८६९ साली म. जोतिबा फुले यांनी झाडा-झुडपात, पालापाचोळ्यात हरवलेली शिवरायांची समाधी जोतिरावांनी मोठ्या कष्टाने शोधून काढली. त्यांनी समाधी स्वच्छ केली आणि त्यावर फुलं वाहिली.





# शिवजयंती उत्सवाची सुरुवात कुणी केली?


हिराबागेत आयोजित शिवसमाधी सभेत जोतिरावांनी समाधीची माहिती सांगितली. या सभेत चाफळकर स्वामी, गंगारामभाऊ म्हस्के आदी मान्यवरांची भाषणे झाली.

त्याच सभेत शिवजयंती उत्सव सुरू करण्याचा विचार जोतिरावांनी मांडला. बैठकीत शिवजयंतीसाठी एकूण २७ रु. लोकवर्गणी जमली.

पुण्यात आणि रायगडावर जोतिरावांनी शिवजयंती उत्सवाची सुरुवात केली.



संविधान जागर अभियान



# सर्व जाती-धर्मांचे मावळे महाराजांसाठी जीव द्यायला का तयार होते ?

## कारण शिवरायांनी रयतेची काळजी घेतली.

रयतेकडून शेतसारा वसूल करायचं काम वतनदारांचं होतं. ते रयतेकडून जास्त सारा वसूल करत.




महाराजांनी रयतेला त्रास देणाऱ्या वतनदारांवर जरब बसवला.

## महाराजांच्या आज्ञा




"वतनदारांस वाडेहुडे बांधूं न द्यावे. आहे ते वतन चालवून प्रजेवर यांची सत्ता असूं न द्यावी."

"उत्पनाचा आजमास पाहून रयतेवर कर बसवावा. जुलूम असा कोणावर करू नये."

संविधान जागर अभियान

# सर्व जाती-धर्माचे मावळे महाराजांसाठी जीव द्यायला का तयार होते ?



# कारण शिवरायांनी रयतेची काळजी घेतली.



## शेतकऱ्यांना अन्नधान्य, बी-बियाणे, औतकाठी दिली. बैल घ्यायला कर्ज दिलं.

१६७६ मध्ये प्रभावळीचा सुभेदार रामजी अनंत यांस हे पत्र -

"ज्याकडे सेत (शेत) करावयास कुवत आहे, माणूस आहे आणि ज्याला जोतास बैल, नांगर, पोटास दाणे नाही, त्याविणा तो आडोन निकामी झाला असेल तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दोनचार बैलाचे पैसे द्यावे. बैल घेवावे आणि पोटास खंडि दोन खंडि दाणे द्यावे. जे सेत त्याच्याने करवेल तितके करवावे. नंतर त्यापासून बैलाचे व गल्याचे पैसे वाढीदिढीचे व्याज न घेता फक्त मुद्दलच हळूहळू शेतकऱ्याच्या तवानगी(सामर्थ्य पाहून) माफीक घेत जावे."

## दुष्काळ पडल्यास शेतसारा माफ

दुष्काळात शेतकऱ्यांना सढळ हाताने कर्ज देत, जे त्यांनी चार-पाच वर्षांच्या हप्त्यांनी फेडावे, असे असे.

संविधान जागर अभियान



# सर्व जाती-धर्माचे मावळे महाराजांसाठी जीव द्यायला का तयार होते ?

# कारण शिवरायांनी रयतेच्या पिकांची काळजी घेतली.

"रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये."



कोणत्याही मोहिमेवर सैन्याच्या तुकडीने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून जाता कामा नये.

सैन्याचा रयतेला त्रास होता कामा नये.

सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली तर रोख रक्कम देऊन खरेदी झाली पाहिजे.


स्वराज्याच्या कामासाठी लाकडाची गरज असल्यास महाराज काय म्हणतात -

"रयतांनी ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करुन वाढविली. त्यांचे दु:खास पारावर काय? कदाचित एखादे झाड बहुत जीर्ण होवून कामातून गेले असले तरी, त्याचे धन्यास राजी करुन घेऊन द्रव्य (पैसे) देऊन त्याचे संतोष तोडून द्यावे."

रयतेप्रती असलेल्या संवेदनशीलतेचा उत्कृष्ट नमुना

१९ मे १६७३- चिपळूणच्या जुमलेदार, हवालदार व कारकुनास पत्र

"कोणी आगट्या करतील, चुली रंधनाळा (अन्न शिजवतील) करतील, तंबाखूला आगी गेतील, रात्री दिवा घरात असेल उंदीर वात नेईल. आग लागून सारे जळून खाक होईल. ते गोष्टी न हो."



संविधान जागर अभियान

# सर्व जाती-धर्माचे मावळे महाराजांसाठी जीव द्यायला का तयार होते ?

## कारण शिवरायांनी आया-बहिणींची काळजी घेतली.



### पुण्याजवळील रांझे गावातील घटना

शेतकऱ्याच्या पोरीवर बलात्कार करणाऱ्या बाबाजी भिकाजी गुजर या रांझाच्या पाटलाचे हात-पाय तोडायची शिक्षा दिली.

### बेलवडी, कर्नाटकमधील घटना

महाराजांचा सरदार सकुजी गायकवाड याने २७ दिवस लढलेल्या मल्लम्मा/सावित्री देसाई नावाच्या शत्रू स्त्रीवर हात टाकला. महाराजांनी आपल्याच सरदाराचे डोळे काढले आणि त्याला त्याच किल्ल्यात खितपत ठेवलं.



त्या घटनेनंतर महाराजांनी सावित्रीच्या बाळाला दूध-भात म्हणून तो प्रदेश पुन्हा दिला. ह्या घटनेचं शिल्प सावित्री देसाईनं तयार केलं, ज्यात महाराजांनी बाळाला मांडिवर घेतलं आहे.



महाराजांचं हेच पहिलं शिल्प आहे, जे त्यांच्या हयातीत बनलं.

संविधान जागर अभियान

# छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व धर्मांचा आदर केला

## सैन्यात भरती होण्यासाठी धर्म ही अट नव्हती.
## तर स्वराज्यनिष्ठा आवश्यक होती.

**नूरखान बेग**
पहिला सरनोबत

**सिद्दी इब्राहिम**
अंगरक्षक

**इब्राहिम खान**
तोफखाना प्रमुख

**काजी हैदर**
वकील

**सिद्दी वाहवाह**
घोडदळ सरदार

> “ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा,
> यात कोणी बखेडा करू नये.”

– शिवरायांची आज्ञा




**मीर महंमद**
महाराजांचं पहिलं चित्र काढणारे चित्रकार

मुलखातील देव-देवस्थानास दिवाबत्ती,
नैवेद्य, अभिषेक स्थान पाहून चालविले.
मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती,
नैवेद्य स्थान पाहून यथायोग्य चालविले.

– सभासद बखर

केळशीचे हजरत बाबा याकुत
यांना दर्गा बांधण्यासाठी
अनुदान दिले.
शिवाय वर्षासन देऊन तेथील
खर्चाची सोय केली.



अफजलखानाला मारल्यानंतर वैर संपलं.
महाराजांनी प्रतापगडावर
**अफजलखानाची कबर बांधली.**



**संविधान जागर अभियान**